महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार विहित कालमर्यादेत कार्यवाही करण्याबाबत...

परिपत्रक

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जा.क्र/साप्रवि-१/रवका/९८१/२०२६
अहिल्यानगर दिनांक- स्वाक्षरीखाली नमुद प्रमाणे

वाचा - महाराष्ट्र शासन, सा. प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. **सांकीर्ण-२०२६/प्र.क्र.४९/रवका-१,दि. ०५ ऑक्टोबर २०२६**

उपरोक्त संदर्भीय शासन परिपत्रकान्वये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार शासकीय कामकाज विहित कालमर्यादेत व तातडीने पूर्ण करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत.
त्यानुषंगाने आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयामध्ये प्राप्त होणारे अर्ज, निवेदने, संदर्भ, पत्रे व प्रकरणे/नस्त्या यांचा प्रलंबित कालावधी विचारात घेऊन त्यांचा तातडीने निपटारा करण्यात यावा.
तसेच, **शासन परिपत्रकातील निर्देशानुसार पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी :-**

१. आपल्या विभागामध्ये प्रलंबित असलेल्या सर्व अर्ज/निवेदने/प्रकरणे/नस्त्यांचा **मासिक आढावा** घेण्यात यावा.

२. कोणतेही प्रकरण सबळ कारणाशिवाय अनावश्यकपणे प्रलंबित ठेवण्यात येऊ नये व संबंधित प्रकरणांचा शक्य तितक्या शीघ्रतेने निपटारा करण्यात यावा.

३. आपल्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा विहित कालमर्यादेत निपटारा करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात याव्यात.

४. प्रलंबित प्रकरणांचा मासिक आढावा घेऊन शासन परिपत्रकानुसार खालील नमुन्यात मासिक विवरणपत्र तयार ठेवावे :-

अ.क्र.	प्राप्त अर्ज/संदर्भ/नस्त्या	निकाली काढलेले अर्ज/संदर्भ/नस्त्या	प्रलंबित अर्ज/संदर्भ/नस्त्या	प्रलंबित प्रकरणांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती
1	2	3	4	5

५. आपल्या अधिपत्याखालील कार्यालयांची प्रत्यक्ष भेट देऊन प्रलंबित प्रकरणांवरील कार्यवाहीचा मासिक आढावा घेण्यात यावा.

६. विहित कालमर्यादेत कार्यवाही न करणाऱ्या किंवा विनाकारण प्रकरणे प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून, अधिनियमातील तरतुदीनुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत प्रस्ताव सादर करावा.

७. विलंबास जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध केलेल्या कार्यवाहीचा अहवाल खालील नमुन्यात सादर करण्यासाठी आवश्यक नोंद ठेवणेत यावी.

अ.क्र.	विलंबास जबाबदार अधिकारी/कर्मचारी संख्या	जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्ध केलेल्या कार्यवाहीचा अहवाल
1	2	3

वरीलप्रमाणे कार्यवाही करून आपल्या विभागातील प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यात यावा. सदर बाबतीत कोणत्याही प्रकारचा अनावश्यक विलंब होणार नाही याची दक्षता घेणेत यावी.

सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांची राहील. सदर परिपत्रकामधील सुचनाची अंमलबजावणी न करणा-या संबधीत अधिकारी व कर्मचारी यांच्या विरुध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या https://nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असुन त्यांचा सकेतांक क्रमांक 202611040402l6 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 04-11-2026 16:27:05
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. खाते प्रमुख (सर्व), जिल्हा परिषद अहिल्यानगर
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व),जिल्हा अहिल्यानगर

२/- सर्व खाते प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी आपले कार्यालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे सदर शासन परिपत्रक निदर्शनासआणावे व त्यानुसार कार्यवाही होईल याची दक्षता घ्यावी.

स्वाक्षरी XXX
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर